कार्यालय पोलीस अधीक्षक

दिनांक ०३/०७/२०१७

# एनटीसिपी भरारी पथकाची रेस्टॉरंट आणि पानठेला चालकावर दंडात्मक कारवाई

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम गडचिरोलीच्या माध्यमातून गडचिरोली जिल्हयाला तंबाखु मुक्त करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

कोटपा सन २००३ कायदयाअंतर्गत गडचिरोली जिल्हयात भरारी पथक कोटपा स्कॉड स्थापन करुन कायदयाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. सोमवार दिनांक ०३/०७/२०१७ रोजी भरारी पथकाने पानठेला आणि रेस्टॉरंट चालकांना कोटपा कायदयाचे उल्लंघन केल्या सबंधात तपासणी करुन त्याच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. आणि कायदा नुसार दुकाणात सुचना फलक लावण्याच्या सुचना देण्यात आल्या.

भरारी पथकमध्ये मा. जिल्हा पोलीस अधिक्षक सा गडचिरोली तसेच डॉ. कैलास नगराळे जिल्हा सल्लागार एन.टी.सी.पी., सामान्य रुग्णालय गडचिरोली यांच्या आदेशान्वये व पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोउपनि समु चौधरी, पोहवा/प्रेमकुमार दुर्गे, पोहवा/प्रमोद वाळके, पोना/उध्दव नरोटे, चापोशि/चौरे, यांनी योग्यरित्या कार्यवाई पार पाडली व पानठेला चालक व रेस्टॉरंट मालकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.